# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.11.2024** **वार – बुधवार**

---

**करार**

पुण्यातील संरक्षण प्रगत तंत्रज्ञान संस्था आणि पिलानी इथल्या बिर्ला तंत्रज्ञान संस्थेनं नुकताच एक शैक्षणिक सामंजस्य करार केला. राष्ट्रीय सुरक्षितता, विद्यार्थी, प्राध्यापक, साधनस्त्रोतांची देवाणघेवाण, संयुक्त शिकाऊ उमेदवारी, पीएचडी आणि एम.टेक., प्रबंध असे काही प्रमुख उपक्रम या सामंजस्य करारामध्ये अंतर्भूत आहेत.

**रक्त तुटवडा**

पुण्यात रक्ताचा तुटवडा ही गंभीर समस्या बनली असून दर तीन महिन्यांनी रक्तदान शिबिरं आयोजित केली पाहिजेत. प्रत्येक नागरिकानं स्वेच्छेनं रक्तदान केलं पाहिजे असं रक्ताचे नाते ट्रस्टचे अध्यक्ष राम बांगड यांनी आवाहन केलं आहे. शहरातील रक्तपेढ्यांमध्ये सध्या १ ते २ दिवसांचा रक्त पुरवठा आहे. सुट्यांचा काळ, रक्तदान शिबिरांची घटलेली संख्या आणि डेंग्यूच्या रुग्णांची वाढती संख्या या परस्पर विरोधी परिस्थितीमुळे रक्ताची मागणी वाढली असल्याचं बांगड म्हणाले.

**बाल विवाहमुक्त भारत**

केंद्र सरकारनं बाल विवाहमुक्त भारत या राष्ट्रीय अभियानाची आज नवी दिल्लीत सुरुवात केली. भारताला बालविवाहमुक्त राष्ट्र बनवणं हा या मोहिमेचा प्राथमिक उद्देश आहे. या मोहिमेचा शुभारंभ करताना, महिला आणि बालविकास मंत्री अन्नपूर्णा देवी म्हणाल्या की सरकारनं ही मोहीम केंद्रित पद्धतीनं राबविण्यासाठी 130 जिल्हे निश्चित केले आहेत. बालविवाह हा केवळ फौजदारी गुन्हा नसून मानवी हक्कांचं उल्लंघन आहे असं सांगून मंत्री म्हणाल्या की, बाल विवाह मुक्त भारत मोहीम हा केवळ 10 किंवा 15 दिवसांचा कार्यक्रम नसून एक निरंतर प्रयत्न आहे आणि भारत बालविवाहापासून मुक्त होईपर्यंत तो सुरू राहील. अन्नपूर्णा देवी यांनी बालविवाहमुक्त भारत पोर्टलचं अनावरणही केलं. जागरूकता वाढवणं, बालविवाह रोखणं आणि बालविवाहाच्या घटनांची प्रभावीपणे नोंद करणं याद्वारे मोहिमेला पाठिंबा देण्यासाठी हे ऑनलाइन व्यासपीठ विकसित केलं आहे.

**गरीब कल्याण अन्न योजना**

देशातील 80 कोटी लोकांना प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेंतर्गत समाविष्ट केलं असल्याचं केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री निमुबेन बांभनिया यांनी आज लोकसभेत सांगितलं. योजना पुढील पाच वर्षे सुरू ठेवण्यासाठी कोणतेही सर्वेक्षण केलेलं नाही तथापि, गरीब लाभार्थ्यांचा आर्थिक भार दूर करण्यासाठी, मोफत अन्नधान्य वितरणाचा कालावधी यावर्षी जानेवारीपासून आणखी पाच वर्षांसाठी वाढवण्यात आला आहे.

**सौर यंत्रणा  सूर्यघर**

पीएम-सूर्य घर मोफत वीज योजनेंतर्गत घराच्या छतावर सौर यंत्रणा बसविण्यात गुजरात आघाडीवर असल्याची माहिती नवीन आणि नवीकरणीय ऊर्जा राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी आज लोकसभेत दिली. देशभरात योजनेखाली सुमारे 26 लाख अर्ज प्राप्त झाले आहेत आणि 6 लाख 16 हजारांहून अधिक सौर यंत्रणा पूर्ण झाल्या आहेत. 2 लाख 81 हजारहून अधिक सौर यंत्रणांसह गुजरात सर्व राज्यांमध्ये आघाडीवर आहे. महाराष्ट्रात 1 लाख 20 हजारांहून घरांवर सौर यंत्रणा उभारल्या आहेत.

**उच्च गती रेल्वेचं डिझाईन**

भारतीय रेल्वेनं उच्च गती रेल्वेचं डिझाईन आणि उत्पादन हाती घेतलं आहे. रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज सांगितलं की, इंटिग्रल कोच फॅक्टरीच्या सहकार्यानं निर्मित या रेल्वेचा वेग 280 किलोमीटर प्रति तास असेल. रेल्वे मंत्री म्हणाले की वंदे भारत एक्सप्रेस गाड्यांमधून जाणाऱ्या प्रवाशांची संख्या क्षमतेच्या 100 टक्क्यांहून अधिक आहे.

**अटल-लॅब**

नीति आयोगाच्या अटल इनोव्हेशन मिशन अंतर्गत देशभरात स्थापन केलेल्या 10 हजार अटल टिंकरिंग प्रयोगशाळांपैकी 5 हजार 692 प्रयोगशाळा ग्रामीण भागात आहेत. यातील एक हजार 22 एटीएल आकांक्षी जिल्ह्यांमध्ये स्थापित आहेत, तर 375 आकांक्षी खंडांमध्ये आहेत. अटल प्रयोगशाळेत विद्यार्थ्यांना त्यांच्या कल्पनाशक्तीचा विस्तार करण्यासोबत नाविन्यपूर्ण कौशल्यंही शिकवली जातात.

**तथागत**

भारतीय संविधान दिनानिमित्त विश्वबंधुता साहित्य परिषद आणि दर्पण प्रकाशन पुणे यांच्या वतीनं आयोजित लोककवी वामनदादा कर्डक महाकवी संमेलनाचं उद्घाटन पहिल्या विश्वबंधुता विद्यार्थी-शिक्षक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉक्टर सविता पाटील यांच्या हस्ते करण्यात आलं. नवी

पेठेतील पत्रकार भवनात आयोजित संमेलनात 110 हून अधिक कवींनी आपल्या काव्यरचना सादर केल्या.

**पिंपरी-चिंचवड संविधान कार्यक्रम**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीनं भारतीय संविधान दिनानिमित्त पिंपरी इथं काल आणि आज प्रबोधनात्मक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. आज सकाळच्या सत्रात गीत गायनाचा कार्यक्रम तसंच भारतीय संविधानाला अभिप्रेत समाज व्यवस्था या विषयावर परिसंवादाचं आयोजन करण्यात आलं.

**संविधान**

भारतीय रिपब्लिकन पार्टी (आठवले) आणि बावधन इथलं विकास प्रतिष्ठान यांच्याद्वारे चेतन दत्ताजी गायकवाड हायस्कूल इथं संविधान उद्देशिकेचं सामूहिक वाचन आणि हायस्कूलमधील विद्यार्थ्यांना खाऊवाटप करण्यात आलं.

पुणे आणि परिसरात चांगली थंडी जाणवते आहे. आज किमान तापमान 10 अंश सेल्सियस होतं, उद्या ते आणखी घसरुन 9 अंश सेल्सियस राहण्याचा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**